


पुनर्भेट

स्मरते आता सारे सारे
जरी हरवूनी गेला काळ
तूच फुलवारा मनसुंदरा
प्रसन्न कळीचे प्रीतफुल ----

कोण कुठे कसे हरवले
कधी कुणा नाही कळले
भेट ओंडक्याची अनाहूत
होते महासागरी ऐकलेले ----

सारीच खेळी रघुरायाची
इच्छील भाळीचे लाभले
पुनर्भेट अपुली झाली
जीवन हे कृतार्थ झाले ----

आता कशाला काय हवे
अंतःपुरीची मुर्ती राऊळी
दीपशिखा तू मनगाभारी
दिव्याची साक्ष सोज्वळी ----



वि.ग. सातपुते (भावकवी)